**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
सुविड फाउंडेशन, रिसोड
वाशिम

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 11-11-2025**

**वॉशिम(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-11-11 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-11-12 | 2025-11-13 | 2025-11-14 | 2025-11-15 | 2025-11-16 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 30.2 | 28.1 | 28.1 | 27.9 | 27.0 |
| किमान तापमान (अं.से) | 11.6 | 11.9 | 12.1 | 10.9 | 11.1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 53 | 52 | 53 | 49 | 54 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 26 | 25 | 25 | 23 | 28 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 3 | 4 | 5 | 5 | 5 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 34 | 37 | 39 | 63 | 72 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| चेतावणी | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही |

## भविष्यवाणी सारांश:

•वाशीम जिल्ह्यात भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार पुढील ५ दिवस आकाश स्वच्छ राहून वातावरण कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •पुढील पाच दिवसात कमाल आणि किमान तापमानात कोणताही मोठा बदल होणार नाही. •विस्तारित अंदाजानुसार (ईआरएफएस) वाशीम जिल्ह्यात दिनांक १६ ते २२ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पाऊस सरासरी तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

कोणताही ईशारा नाही

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

काही नाही

## कृषि सल्ला:

• रब्बी हंगामाकरिता वांगी, टोमाटो, मिरची, कोबी व फुलकोबी बियाण्याची गादी वाफ्यावर पेरणी करावी. •पिकाची अवस्था आणि जमिनीतील ओलावा यांची खात्री करून पिकाला शक्यतो सूक्ष्मसिंचन पद्धतीने ओलीत करावे. •कीटकनाशके फवारणी करतांना शेतकऱ्यांनी संरक्षक कपडे ,हातमोजे, मास्क ,बूट ईत्यादी चा वापर करावा. •किडींच्या/ किटकांच्या निरीक्षनाकरीता शेतामध्ये पिवळे चिकट सापळे/कामगंध सापळे लावावेत.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

पिकाची अवस्था आणि जमिनीतील ओलावा यांची खात्री करून पिकाला शक्यतो सूक्ष्मसिंचन पद्धतीने ओलीत करावे.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तूर | •तूर पिकामध्ये हेक्टरी ४ ते ५ कामगंध सापळे लावावे सापळ्यात अडकलेले नर पतंग वेळोवेळी काढून नष्ट करावे तसेच विशिष्ट कालावधीत वड्या (ल्युर )बदलाव्या. तूर पिकात कळ्या व फुले खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी •फुलगळ होऊ नये याकरिता प्लानोफिक्स ५ मिली + कार्बेन्दान्झीम १० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कपाशी | •परिपक्व व पूर्ण उमललेल्या बोंडातील कापूस वेचणी करावा. अपरिपक्व व अर्धवट उमललेल्या बोंडातील कापसात पाण्याचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे अशा बोंडातील कापूस वेचून तसाच साठविल्यास रुईला |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | पिवळसरपणा येतो.प्रत्येक वेचणीनंतर कापूस सावलीत वाळवून नंतरच साठवावा.कापूस मोकळी हवा असलेल्या ठिकाणी साठवावा. ओलसर जागेत साठवणूक केल्यास कापसाला पिवळसरपणा येतो, त्यामुळे रुई आणि धाग्याची प्रत खालावते. • कपाशीची पाने लालसर झाल्यास २ किलो डीएपी + १ किलो मॅग्नेशियम सल्फेट किवा १ किलो पोटेशीअम नायट्रेट १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| करंडई | • करडईची पेरणी झाली असलेल्या ठिकाणी उगवणीनंतर १० ते १२ दिवसांनी करडई पिकाची विरळणी करणे आवशक आहे विरळणी करतांना चांगली जोमदार रोपे ठेवावीत दोन रोपामधील अंतर २० ते ३० से.मी ठेवावे.पिकामध्ये आंतरमशागत करून पीक तणमुक्त ठेवावे. करडई पिकास गरज पडल्यास संरक्षित ओलीत करावे. |
| ज्वारी | • रबी ज्वारी पिकाची पेरणी झाली असलेल्या ठिकाणी पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी रबी ज्वारी पिकाची विरळणी करणे आवशक आहे विरळणी करतांना दोन रोपामधील अंतर १५ ते २० से.मी ठेवावे. •रब्बी ज्वारीच्या शेतात डवरणी करून जमीन भुसभुशीत ठेवावी व पिक तणमुक्त ठेवावे. ज्वारी पिकास गरज पडल्यास संरक्षित ओलीत करावे. |
| हरभरा | •वेळेवर पेरलेल्या हरभरा पिकामध्ये आंतरमशागत करून पिक तणमुक्त ठेवावे. •पाण्याची उपलब्धता असल्यास आवश्यकता असल्यास पिकाला संरक्षित ओलीत करावे. |
| गहू | • ओलिताखाली गहू पेरणी १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. • गव्हाचे बागायती वेळेवर पेरणी ससाठी वाण एकेडब्ल्यू-१०७१ (पूर्णा), एकेडब्ल्यू-३७२२ (विमल), एचडी-२१८९, एचडी-२३८०. गहाचे बागायती उशरा पेरणी साठीवाण पीडीकेव्ही सरदार (एकेडब्ल्यू - ४२१०-६ ), एकेडब्ल्यू -४६२७, एकेडब्ल्यू -३८१, एकेडब्ल्यू-१०७१ (पूर्णा),एचआय-९७७ . • पेरणी पूर्व बियाण्यास थायरम किंवा व्हीटावाक्स ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी २.५ गरम प्रती किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया केल्यानंतर १० किलो बियाण्यास अझोटोबेक्टर १० मिली स्फुरद विरघळनारे जीवाणू जीवाणू खत (पी .एस. बी) १० मिली या जीवाणूसंवधकाची बीज प्रक्रिया करावी. पेरणीच्या वेळी बियाणे ५ से.मी. पेक्षा खोल पडणार याची काळजी यावी.पेरणी करता दोन ओळीतील अंतर २३ से. मी. ठेवावे. पेरणीच्या वेळी ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद प्रती हेक्टरी द्यावे. • पेरणीसाठी वापरण्यात येणाऱ्या बियाण्याला बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी , योग्य त्या कीटकनाशकाची आणी बुरशीनाशकाची प्रक्रिया केल्यास कीड आणी बुरशीपासून संरक्षण होऊन उगवण क्षमतेत वाढ होते परणामी पेरणीसाठी अधिक बियाणे वापरावे लागत नाही, बिजप्रक्रीयेमुळे सशक्त आणी गुणवत्ता युक्त रोपे तसेच कीड आणी रोगमुक्त रोपे मिळतात. |
| मोहरी | संरक्षित ओलीताखालीली सलग मोहरीची पेरणी १५ नोव्हेंबर पर्यत करावी.पुसाबोल्ड जातीचे हेक्टरी ५ किलो बियाणे ४५ सें.मी. अंतरावर पेरावे.पेरणीच्या वेळी हेक्टरी १०० किलो युरिया + २५० किलो सिंगल सुपर फास्फेट द्यावे. अधिक उत्पादनासाठी प्रती हेक्टरी १० किलो गंधक आणी १ किलो बोरॉन पेरणीच्या वेळीच द्यावे. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| अळशी | •ओलीताखालीली जवस पिकाची पेरणी उशिरात उशिरा पेरणी १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. • जवस पिकात शेतात डवरणी करून जमीन भुसभुशीत ठेवावी व पिक तणमुक्त ठेवावे |
| मिरची | •मिरची पिकात फळकुज, फांद्या वाळणे किंवा फळांवरील डाग आढळून आल्यास रोगग्रस्त शेंडे खुडून टाकावेत व नंतर मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा डायफेनकोनॅझोल ५ मिली प्रती१० लिटर पाण्यात मिसळून दर १५ दिवसांच्या अंतराने३-४ फवारण्या कराव्या. •पुढील पाच दिवस कोरडे हवामान राहण्याची शक्यता लक्षात घेता भाजीपाला पिकास आवश्क्तेनुसार पाणी द्यावे. |
| टोमॅटो | • सद्यस्थितीत ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून असल्यास नियंत्रणासाठी मॅनकोझेब ७५डब्लूपी. २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०डब्लूपी. २५ग्राम, १०लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलकिडे आणि पांढऱ्यामाशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्याव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट३०टक्के प्रवाही१०मिली प्रती१०लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. •पुढील पाच दिवस कोरडे हवामान राहण्याची शक्यता लक्षात घेता भाजीपाला पिकास आवश्क्तेनुसार पाणी द्यावे. |
| हळद | •उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. • सध्या बऱ्याच ठिकाणी पाऊस व ढगाळ वातावणामुळे हळदीवर करपा, पानावरील ठिपके प्रादुर्भाव दिसून येत आहे. हळदीवरील पानावरील ठिपके आणी करपा याच्या व्यवस्थापणासाठी कार्बेनडेंझीम ५० टक्के ४०० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के ५०० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड ५० टक्के ५०० ग्रॅम प्रती एकर फवारणी करावी. •हळद पिकाला पाण्याचा ताण बसू नये म्हणून दर ८-१० दिवसांनी ओलीत करावे. जमिनीच्यामगदुराप्रमाणे किंवा पिकाच्या गरजेनुसार हा कालावधी कमी जास्त करावा. |
| संत्रा | • आंबिया बहराच्या परिपक्व फळांची काढणी करावी. •फळ काढणी नंतर मृत/जुनाट फांद्या काढून नष्ट कराव्यात व त्यानंतर १ टक्का कार्बेडान्झीम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. •संत्राफळबागेत खताचेनिर्धारित केलेल्याव्यवस्थापनानुसार १०८ ग्रॅम युरियाव ४५ ग्रॅम म्युरेटऑफ पोटॅश प्रतीझाड असे १ वर्ष वयाच्या झाडांसाठीद्यावे. चार किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे झाडासाठी चौपट खतांची मात्रा द्यावी. •पुढील पाच दिवस कोरडे हवामान राहण्याची शक्यता लक्षात घेता संत्रा बागेस आवश्क्तेनुसार पाणी द्यावे. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • जंतनाशकाची मात्रा ३ महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी.<br>•सध्याचे किमान तापमान लक्षात घेता मुख्यतः रात्रीच्या वेळी जनावरांचे थंडीपासून संरक्षण करावे. |

**कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:**

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • कोंबड्यांच्या सर्व पिल्लांना खाद्य समान मिळेल यासाठी खाद्याचे भांडे दिवसातून दोनवेळा भरून ठेवावे. • कोंबड्याच्या शेडच्या सभोवतालचा परिसर स्वच्छं ठेवावा. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | •हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |

**हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):**

| |
|---|
| काही नाही |

**परिणाम आधारित सल्ला (सामान्य):**

| |
|---|
| काही नाही |

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**